। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ११० वा । रविवार दिनांक ०५ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## जिल्हाधिकारी कार्यालयात कायदेविषयक मदत केंद्राचे उद्घाटन

# समन्वयातूनच शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक गरजूपर्यंत पोहोचेल-प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव

धाराशिव (जिमाका)- सर्वसामान्य नागरिकांना मोफत व योग्य कायदेविषयक मार्गदर्शन मिळावे, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचावा आणि विविध विभागांमध्ये समन्वय वाढावा,या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद आणि जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या कायदेविषयक मदत केंद्राचे उद्घाटन गुरुवारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अभिश्री देव यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे व देवेंद्र कटके,न्यायिक अधिकारी,विधिज्ञ तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव म्हणाल्या,हे कायदेविषयक मदत केंद्र सुरू करण्यासाठी जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी पुढाकार घेतला,ही महत्त्वाची बाब आहे.शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना असून त्या प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत.कौटुंबिक न्यायालयाच्या माध्यमातून कौटुंबिक वादांची प्रकरणे सोडविली जातात. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम केल्यास नागरिकांना कायदेशीर मदत आणि शासकीय योजनांचा लाभ अधिक सहजपणे मिळू शकतो. त्यामुळे प्रत्येक विभागाने समन्वयातून काम करून शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवाव्यात.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले,हा क्षण ऐतिहासिक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध विभागांकडे दररोज अनेक नागरिक विविध समस्या घेऊन येतात.अनेक प्रकरणांमध्ये त्यांना कायदेशीर मार्गदर्शनाची गरज भासते.या कायदेविषयक मदत केंद्रामुळे नागरिकांना योग्य वेळी सक्षम कायदेशीर मार्गदर्शन मिळेल.नागरिक आणि प्रशासन यांच्यातील एक प्रभावी सेतू म्हणून हे केंद्र कार्य करेल.शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास लाभार्थ्यांपर्यंत त्याचा अधिक परिणामकारक लाभ पोहोचेल.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर यांनी सांगितले की,या केंद्रामुळे नागरिकांसाठी मोफत व योग्य कायदेविषयक मार्गदर्शनाची नवी सुविधा उपलब्ध झाली आहे.त्यामुळे विविध विभागांमध्ये अधिक चांगला समन्वय साधता येईल.तसेच बालस्नेही योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासही या केंद्राची मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती.भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, विधी सेवा प्राधिकरण केवळ समाजातील गरजू व वंचित घटकांना मोफत कायदेविषयक सल्ला देत नाही,तर विविध कायदेविषयक शिबिरांच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचेही कार्य सातत्याने करत आहे.योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परस्पर समन्वय आवश्यक असून,'अधिकार मित्र' यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी सांगितले की,न्यायापासून दूर असलेल्या जिल्ह्यातील गरजू नागरिकांना या केंद्राच्या माध्यमातून मोफत कायदेविषयक मार्गदर्शन मिळणार आहे. गरीब आणि खऱ्या अर्थाने गरजू व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी हे केंद्र प्रभावी




माध्यम ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व तहसीलदार ऑनलाईन माध्यमातून सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे संचालन ॲड.श्रीमती.कदम यांनी केले उपस्थितांचे आभार अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी मानले. कायदेविषयक मदत केंद्राच्या माध्यमातून माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना, उत्तर-पूर्वेकडील राज्यांतील नागरिकांना, ज्येष्ठ नागरिकांना,बालकांना तसेच मानसिक दिव्यांग व्यक्तींना मोफत कायदेविषयक मार्गदर्शन व विधी सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

मोफत विधी सहाय्यासाठी इच्छुकांनी (०२४७२) २२५४२४ किंवा ८५९१९०३६२५ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

नळदुर्ग(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत अमोल वय २७ वर्षे, रा.धनगरवाडी ता. तुळजापुर जि. धाराशिव हे दि ०२.०७.२०२६ रोजी जुने सितारा हॉटेल नळदुर्ग येथील रोडवर अंदाजे ४२,६०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५४ सिलबंद बाटल्या सह मोटरसायकल क्र एमएच २५ ए.एक्स ७७९५ अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

तुळजापूर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंमर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी दि.०३.०७.२०२६ रोजी तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत जुने बसस्थानकचे मागील बाजूस शौचालय समोर तुळजापूर येथे छापा टाकला. यावेळी नितीन वय ३६ वर्षे, रा. आमृतवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे १४.०० वा. सु. जुने बसस्थानकाचे मागील बाजूस शौचालय समोर तुळजापूर येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण १,४३० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### कळंब येथून मोटारसायकलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रदीप महावीर सांगवे, वय ४४ वर्षे, रा.देवी मंदीराजवळ कळंब ता. कळंब जि.धाराशिव यांची हिरो कंपनीची आय स्मार्ट मोटरसायकल ही दि.२५.०६.२०२६ रोजी १४.३० ते १४.४० वा. सु.बसस्थानक कळंब येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी प्रदीप सांगवे यांनी दि.०२.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# देहदानाचा संकल्प पूर्ण करत पद्मिणी शिवाजीराव शेळके यांचे निधन; समाजापुढे ठेवला आदर्श



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- शिव, शाहू, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचे समर्थक दिवंगत शिवाजीराव शेळके यांच्या पत्नी पद्मिणी शिवाजीराव शेळके यांचे गुरुवारी (दि. २ जुलै) सायंकाळी सुमारे ५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने शेळके परिवारासह परिसरात शोककळा पसरली आहे.

पद्मिणी शेळके यांनी दोन वर्षांपूर्वीच देहदान व नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार पुत्र सुरेश शेळके व रमेश शेळके यांनी देहदानाची प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा देह धाराशिव जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाकडे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी सुपूर्द केला.

दिवंगत शिवाजीराव शेळके यांनी आयुष्यभर पुरोगामी विचारांचा वारसा जपत सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला होता.

त्याच विचारांचा वारसा पुढे नेत पद्मिणी शेळके यांनीही मृत्यूनंतर देहदानाचा संकल्प पूर्ण करून समाजापुढे प्रेरणादायी आदर्श ठेवला.

त्यांच्या पश्चात दोन मुले - सुरेश शेळके (सेवानिवृत्त वाहक), रमेश शेळके, दोन सुना, एक मुलगी तसेच सात नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# २२५ प्रकल्पांत १०% पाणी, १०२ गावे १८९ अधिग्रहणांवर अवलंबून: शेतीचा पाणीपुरवठा केला बंद, ११३ प्रकल्प जोत्याखाली, सर्व १९ टँकर बंद

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- जुलै महिना उजाडला तरी अद्याप मोठे पाऊस झालेले नाहीत. परिणामी, जिल्ह्यातील तब्बल १०२ गावांची भिस्त अधिग्रहणावर आहे. प्रकल्पातही केवळ १० टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. भविष्यात पाणीटंचाईच्या झळा टाळण्यासाठी प्रशासनाने सर्वच प्रकल्पातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव ठेवले असून, सिंचनासाठी होणारा पुरवठा बंद केला आहे.

गतवर्षी मे ते ऑक्टोबर सहा महिने पावसाचे राहिले होते. यंदा मार्च महिन्यापर्यंत टंचाईच्या झळा गावांना बसल्या नाहीत. मात्र, एप्रिल महिन्यापासून उन्हाचा पारा वाढताच पाण्याचा उपसा वाढू लागला. त्यामुळे १९ टँकरने पाणीपुरवठा करण्याची नामुष्की प्रशासनावर यंदा ओढवली. जून महिन्यातही मोठे पाऊस होतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, जून महिन्यात अपेक्षित पावसाच्या तुलनेत केवळ ८४ टक्के पाऊस झाला. तोही रिमझिम व मध्यम स्वरुपाचा त्यामुळे प्रकल्पात पाणी काही वाढले नाही. आता जुलै महिना उजाडला तरी जिल्ह्यातील एकूण प्रकल्पात २.५९३६ दलघमी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्याची टक्केवारी केवळ १०.१२ टक्के इतकी आहे.

मोठे पाऊस न झाल्याने प्रशासनाला जुलै महिन्यातहील अधिग्रहणे सुरू ठेवावी लागली आहेत. १०२ गावांतील जनतेची १८९ अधिग्रहित विहिरीतील पाण्यावर तहान भागवली जात आहे. पाणी टंचाईचे संकट टाळण्यासाठी सर्वच प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवले आहे.गतवर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील जिल्ह्यातील एकूण २२५ प्रकल्पात १०.४००५७ दलघमी उपयुक्त पाणीसाठा होता. त्याची टक्केवारी ४०.५९ इतकी होती. यंदा प्रकल्पात केवळ १०.१२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे नागरिकांना ऐन पावसाळ्यात टंचाईच्या झळा बसत आहेत.

# गावाच्या सुदृढ आरोग्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज-राजश्री वरपे

कळंब (प्रतिनिधी)--ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याबाबत प्रत्येकाने सतर्क राहून गावाचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे काळाची गरज आहे. सार्वजनिक स्वच्छता, प्रतिबंधात्मक उपाय आणि लोकसहभागातूनच आरोग्यदायी गावाची संकल्पना साकार होऊ शकते, असे प्रतिपादन पंचायत समितीच्या सभापती राजश्री वरपे यांनी केले.

पंचायत समिती व आरोग्य विभागाच्या विद्यमाने पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन केले. या वेळी तालुका आरोग्याधिकारी डॉ. जे. एन. सय्यद, आरोग्य विभागाचे बाबूराव जाधव आदी उपस्थित होते. बैठकीच्या पहिल्या सत्रात आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक, तर दुसऱ्या सत्रात वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहायक, आरोग्य सहायिका, आरोग्यसेविका आणि आरोग्यसेवक सहभागी झाले. बैठकीत विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचा तसेच आरोग्य सेवेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या वेळी सभापती राजश्री वरपे म्हणाल्या, या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे होय. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे, हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते उद्भवूच नयेत, यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण आणि वैयक्तिक स्वच्छता यांसारख्या मूलभूत बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी तसेच ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. पाणी नमुने, लसीकरण मोहिमांबाबत घेतला आढावा माझ गावं, आरोग्य संपन्न गाव कार्यक्रम, पल्स पोलिओ लसीकरण, आयुष्यमान भारत कार्ड, आभा कार्ड, आरोग्य संस्थेतील प्रसूतीबाबत, नियमित लसीकरण व पारधीपेढी व पारधी वस्तीवरील लसीकरणापासून वंचित लाभार्थी व आरोग्य सेवाबाबत, क्षयरोग बेडका नमुने, क्षयरोग मुक्त भारत, कुष्ठरोग बाबत, साथरोग, रक्त नमुने, रक्त जल नमुने, ॲबेटिंग, पाणी नमुने, मीठ नमुने, टीसीएल नमुने याबाबत आढावा घेण्यात आला आहे.

# तामलवाडी येथील विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप



तामलवाडी (प्रतिनिधी)--ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील अंतर, प्रवासातील अडचणी आणि वेळेची बचत लक्षात घेऊन महिला व बालकल्याण तसेच समाजकल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयात २४ गरजू विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम ग्रामीण भागातील मुलींच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी ठरला. या योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू विद्यार्थिनींपर्यंत पोहोचावा यासाठी विद्यालयाचे प्राचार्य सुहास वडणे यांनी विशेष पाठपुरावा केला. तसेच तामलवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग म्हेत्रे यांनीही सातत्यपूर्ण प्रयत्न करून विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दररोज लांबचा पायी प्रवास करावा लागतो. अशा परिस्थितीत सायकल योजना विद्यार्थिनींच्या शाळेतील उपस्थिती वाढवून त्यांच्या शिक्षणाला गती देणारी ठरली आहे.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष बसवणप्पा मसुते, मल्लिकार्जुन मसुते, अब्बास पटेल, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग म्हेत्रे, विद्यालयाचे पर्यवेक्षक महादेव मसुते यांच्यासह शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य सुहास वडणे यांनी विद्यार्थिनींनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश राऊत यांनी केले.

या विद्यार्थिनींना मिळाली सायकल भेट या उपक्रमाचा लाभ संध्या मेनकुदळे, आयेशा मुलानी, तेजश्री वडणे, श्रावणी काशीद, तनुजा जाधव, वैष्णवी देवकर, सुहाना पठाण, प्रचिती माळी, संघर्षा चौगुले, अलमास शेख, श्रावणी गाडे, भूमिका गुंड, श्रद्धा वडणे, दुर्गा नागले, शरण्या लोंढे, अक्षरा इटकर, श्रावणी गुंड, श्रुती भोसले, प्रियंका रणसुरे, संध्या जाधव, श्रावणी चव्हाण यांच्यासह एकूण २४ विद्यार्थिनींना झाला.

# तुळजाभवानीच्या जमिनीवर मातब्बरांचा कब्जा; शासनाची कारवाई कागदावरच? देवाच्या जमिनी मोकळ्या होणार कधी? अतिक्रमणकर्त्यांपुढे प्रशासन हतबल?

तुळजापूर (रामेश्वर डोंगरे)- तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी देवीच्या इनामी जमिनींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हजारो एकर मंदिर जमिनींच्या कथित अनधिकृत हस्तांतरण, फेरफार नोंदी आणि अतिक्रमणाच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश शासनाने दिले असले, तरी प्रत्यक्षात अनेक वर्षांपासून प्रभावशाली व्यक्तींच्या ताब्यात असलेल्या जमिनी आजही शासनाच्या ताब्यात आलेल्या नाहीत.

समोर आलेल्या माहितीनुसार, इनामी जमिनींच्या नोंदींमध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार झाल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी महसूल अभिलेखांमध्ये बदल करून खासगी व्यक्तींच्या नावावर नोंदी करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असली, तरी सर्वसामान्य जनतेचा प्रश्न एकच आहे- **चौकशी होईल, पण प्रत्यक्ष जमिनी मंदिराच्या ताब्यात कधी येणार?**

तुळजाभवानी हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. अशा पवित्र देवस्थानाच्या जमिनींवर जर वर्षानुवर्षे अतिक्रमण राहणार असेल, तर शासनाच्या कारवाईच्या घोषणांचा उपयोग काय? प्रभावशाली व्यक्तींवर कायद्याचा समान वापर होणार का, की कारवाई फक्त कागदावरच राहणार?

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, अनेक वर्षांपासून प्रशासन बदलले, अधिकारी बदलले, सरकारे बदलली; मात्र अतिक्रमण कायम आहे. जेव्हा सर्वसामान्य नागरिकांच्या छोट्याशा अतिक्रमणावर बुलडोझर चालतो, तेव्हा हजारो एकरांच्या कथित बेकायदेशीर ताब्यांवर शासनाचे हात का थरथरतात, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

महसूल विभाग, देवस्थान प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी केवळ चौकशी अहवालांपुरते न थांबता, दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून मंदिराच्या जमिनी पुन्हा मंदिराच्या ताब्यात देण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा, देवाच्या जमिनीही प्रभावशाली लोकांच्या ताब्यात सुरक्षित आणि शासन मात्र असहाय्य अशी भावना जनमानसात अधिक बळावण्याची शक्यता आहे.

आता सर्वांचे लक्ष चौकशी समितीच्या अहवालाकडे लागले आहे. मात्र जनतेचा खरा प्रश्न कायम आहे- अतिक्रमण हटणार कधी आणि दोषींवर कारवाई होणार कधी?

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## धार्मिकस्थळाचे पावित्र टिकवा

आता पर्यंत धार्मिक स्थळाकडे कोणत्याही शासन किंवा प्रशासनाचे लक्ष दिले नाही. याकडे वेगळ्या नजरेने पाहिले जात होते, त्यामुळे धार्मिक स्थळात मनमानेल तसा कारभार चालत आला आहे. धार्मिक स्थळाच्या कारभारात आर्थिक घोटाळे उघडे पडत आहेत. वास्तविक पवित्र ठिकाणी पावित्र राखले पाहिजे. तसे होताना दिसून येत नाही. उलट नको ती घाण दिसून येत आहे. नुकतेच अयोध्या येथील राम मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये, दान केलेल्या निधीच्या अपहारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आठ जणांपैकी किमान पाच जण पैशांची मोजणी करताना, नोटा लपवत असल्याचे समोर आले आहे. अयोध्या प्रकरणी पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिराच्या पिलग्रिम फॅसिलिटी सेंटरमधील ४५ दिवसांच्या फुटेजची कसून तपासणी केल्यावर, पैशांची मोजणी करणाऱ्या पाच कर्मचाऱ्यांनी नोटांचे बंडल काढून ते स्वतःच्या कपड्यांमध्ये किंवा सॉक्समध्ये लपवल्याचे उघड झाले. दरम्यान, ज्या एजन्सीमार्फत या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती, त्या एजन्सीने या कर्मचाऱ्यांची निवड आपण केली नसल्याचा दावा केला आहे. ज्या स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये देणगीची रक्कम जमा केली जात होती, त्याच बँकेने या नियुक्त्यांसाठी या नावांची शिफारस केल्याचे एजन्सीचे म्हणणे आहे. सूत्रांनी सांगितले की, पोलिसांनी देणगीचे पैसे चोरताना दिसलेल्या आरोपींच्या ठिकाणांवर आधीच छापे टाकून रोख रक्कम जप्त केली असून, आतापर्यंत पोलिसांच्या पथकाने सुमारे ८० लाख रुपये हस्तगत केले आहेत. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या तक्रारीवरून पोलिसांनी २५ जून रोजी एफआयआर नोंदवून अविनाश शुक्ला, लवकुश मिश्रा, अनुकल्प मिश्रा, मनिष कुमार यादव, करुनेश पांडे, रामशंकर मिश्रा, टिनू यादव आणि सुभाष श्रीवास्तव या आठ जणांना अटक केली आहे. वास्तविक असा प्रकार होणे योग्य नाही. किमान धर्मिकस्थळी चोरी करणे पाप समजले जाते. प्रत्येक धार्मिकस्थळाकडे मोठ्या भक्ती भावाने पाहिले जाते. धार्मिक भावनापोटी मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. देशातील कोणतेही धार्मिकस्थळाचा अभ्यास केला तर श्रीमंत आहेत. लाखो-करडोची उलाढाल होते. धार्मिकस्थळ असल्याने फारसे कोणी लक्ष घालत नाही. मुळात त्याकडे वेगळ्या नजरेने पाहीले जाते. असे असताना चुकीचे होत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे सर्वच धार्मिक स्थळाबाबत वेगळा निर्णय घेवुन कडक धोरणाची गरज आहे. कडक धोरणात आर्थिक गडबड घोटाळा केल्यास कडक शासनाची तरतुद असली पाहिजे. कोणीही धार्मिकस्थळाच्या ठिकाणी आर्थिक घोटाळा करू नये केला तर मोठी शिक्षा होते अशी भिती निर्माण झाली पाहिजे. आता पर्यंत धार्मिकस्थळात नको ते प्रकार उघडे पडले आहेत. त्यामुळे भावनिक मंडळींना दु:ख होते. भाविक मोठ्या श्रद्धेने दानधर्म करतात. त्याची जपणुक ही धार्मिकस्थळाच्या प्रमुखांनी केली पाहिजे. सरकारने एकदा सर्व धार्मिकस्थळाचे आर्थिक ऑडीट केले तर बिघडणार नाही. तसे पाहिले तर कोणीही धुतल्या तांदळासारखा नाही. मात्र धार्मिक स्थळाच्या ठिकाणी वेगळ्या दृष्टिने पाहिले जाते. इतर ठिकाणी पाहाण्याचा दृष्टिकोन व धार्मिकस्थळाकडे पाहाण्याकडे हा वेगळा असतो. मुळात अनेक धार्मिकस्थळे असे आहेत की, लाखो लोक भेटी देतात, दर्शन घेतात. एकरूपया दान पेटीत टाकले तर दररोज लाखो रूपये जमा होतात. याचे सरकारी, जबाबदाराकडून मुल्यमापन होते का? किंवा पैसे किंवा सोने दान केले जाते याचे कोठे तरी जबाबदार, भरोसाच्या अधिकाऱ्याकडून खजीन्यात जमा होते का? दररोज नाही किमान आठ दिवसाला जमलेल्या रकमेचा आकडा जाहिर केला जातो का? धार्मिक स्थळाच्या उत्पन्नाबाबत पारदर्शिपना नाही हे कोठे तरी मान्य केले पाहिजे. मुळात देशात मोठा काय सर्वात मोठी योजना पुर्ण करण्याएवढी क्षमता धार्मिक स्थळात जमलेल्या रकमेतून होवू .शकते. आज काही ठिकाणी बारकाई पाहिले तर पुजाराचे पोट ज्याल ढेरी म्हणतात किती तुपातील लाडू खावुन मोठं दिसते. पुजा करणारे, भाविकांचे पोट पाटीला दिसते. पुजाऱ्याच्या मुला-मुलींच्या अंगावर लाखो-करडोचे सोने दिसते. भारी वस्त्र दिसते. भाविक, वारी करणारे वारकरी, रांगेत उभा राहुन दर्शन घेणाऱ्या कुटुंबियांच्या लेकराचे अंग झाकण्यासाठी वस्त्र नाहीत. अंगावर सोन्याचा डाग नाही. ही वस्तूस्थिती भाविक व जनतेनी समजून घेतली पाहिजे. देव घराघरात आहे. संत महात्म्यांनी काय सांगितले. आई-वडील पहिले देव आहेत. कणा-कणात ईश्वर सामावला आहे. ईश्वर सर्वत्र आहे तो जाणून घेतला पाहिजे. चित्राची पुजा नाही तर चरित्राची पुजा केली पाहिजे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत गाडगेबाबा असे किती तरी मराठीत ज्ञान देणारे महात्म्ये होवुन गेले त्यांनी कोणता संदेश दिला याचा अभ्यास केला पाहिजे. दान कोणाला करावे. हेही आपल्या संतानी पाहिजे. मंदिरात जावुन दानधर्म करण्यापेक्षा भुकेलेल्या भोजन द्या, गोर-गरीबांना मदत करा. गरीबाचे लेकरांना शाळेत प्रवेशासाठी पैसे नाहीत त्यांना शाळेत घालण्यात मदत करा. एखादी विधवा असेल. सोडून दिलेल्या महिलेस मदत करा. येथेच खरा ईश्वर भेटतो. आशिर्वाद मिळतो. ज्या ठिकाणी आर्थिक घोटाळा केला जातो. धार्मिकस्थळे महिलेंच्या अंगावरील सोने चोरले जाते. सुरक्षितपना नाही हे माहिती असून जर या बाबीला बळी पडत असाल तर यापेक्षा दुसरे दुदैव नाही. त्यामुळे विचार करा. प्रत्येक जाती-धार्मिक स्थळाचे ऑडीट करा. ते सरकारने ताब्यात घ्यावे. धार्मिकस्थळात काही ठिकाणी शस्त्र सापडली. धार्मिक शिक्षण देणारे मुलीशी गैरवर्तन करणारे सापडले, हेच का धार्मिक स्थळाचे पावित्र? देशविरोधीकारवाईसाठी धार्मिकस्थळाचा वापर होत असेल तर ते योग्य आहे का? याचा विचार करा. केवळ दान करून पुण्य मिळत असेल तर यापेक्षा दुसरा सोपा मार्ग नाही. मात्र अशाने पुण्य मिळत नाही. पुण्य व पाप आहे. याचे मुल्यमापन ईश्वर करतो. प्रत्येकाला आपण करीत असलेले कार्य कोणते आहे हे कळून येते. समजते. ईश्वराने अधिक बुद्धी मानवाला दिली आहे. त्यामुळे चुकीच्या ठिकाणी दानधर्म करू नका! ईश्वर सर्वत्र आहे. त्याला मानण्यापेक्षा जाणून घ्या. संतानी काय म्हटले आहे हे एकदा जाणून घेतले पाहिजे. धार्मिकस्थळाच्या सर्वच जातीधर्माच्या धार्मिकस्थळी नको तो प्रकार, भ्रष्टाचार होत असेल तर ते खपुवन घेणार का? अनेक असे ठिकाण आहेत तेथे शोषण केले जाते. अनेक उदा. जाहिर झाले आहेत. धार्मिक स्थळी मग आश्रमात काय चालते हे आज सांगण्याची गरज नाही. त्यामुळे धार्मिकस्थळाबाबत वेगळा कायदा करावा. कसुन चौकशीकरण्याची तरतुद असावी. सर्वात महत्वाचे पावित्र टिकवा. गैरप्रकार होता कामा नये.

# एका दिवसाच्या निकालापलीकडे...

शिक्षणाला न्याय देणारी वाट असावी शेतकरी संपूर्ण वर्षभर शेतात राबतो. उन्हाची झळ, पावसाची अनिश्चितता, वाऱ्याचा मारा आणि मातीशी चाललेला त्याचा अखंड संवाद या सगळ्याचा शेवट एका दिवसाच्या कापणीत होतो. पण त्या एका दिवसावर कोणीही त्याच्या वर्षभराच्या कष्टांचे मोजमाप करत नाही. कारण पीक हे एका दिवसाचे नसते; ते प्रत्येक दिवसाच्या घामाचे संचित असते.

मग विद्यार्थ्यांच्या बाबतीत मात्र आपण वेगळा न्याय का लावतो?




अकरावी-बारावीतील दोन वर्षांचा अभ्यास, शेकडो तासांचे वाचन, प्रयोगशाळेतील प्रयोग, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांची धडपड, अपयशातून उभे राहण्याची हिंमत आणि सातत्याने केलेला सराव या सगळ्याचा हिशेब आपण केवळ तीन तासांच्या प्रवेश परीक्षेत मांडतो. त्या एका दिवसातील यश म्हणजे भविष्य उजळते आणि एखादी चूक झाली तर
दोन वर्षांची मेहनत क्षणात गौण ठरते. ही शिक्षणव्यवस्थेची सर्वात मोठी विसंगती आहे.

याच पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षण प्रवेश परीक्षा - नीट आणि अभियांत्रीकी प्रवेश परीक्षा जेई प्रवेश प्रक्रियेत बारावीच्या गुणांना सुमारे पन्नास टक्के ग्राहय - वेटेज देण्याची उच्चस्तरीय ९ सदस्याच्या समितीची शिफारस समोर आली आहे. हा अंतिम निर्णय नसला, तरी या प्रस्तावाने शिक्षणाविषयीचा एक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

विद्यार्थ्याचे मूल्यमापन एका दिवसाने व्हावे की संपूर्ण शैक्षणिक प्रवासाने? आजची शिक्षणव्यवस्था अनेकदा विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या मंदिरात नव्हे, तर गुणांच्या बाजारात उभे करते. अभ्यासाचा अर्थ समजून घेण्यापेक्षा प्रश्नसंच पाठ करणे महत्त्वाचे ठरते. जिज्ञासेची जागा रँक घेते आणि पुस्तकांच्या सुगंधावर उत्तरपत्रिकेचा दबाव मात करतो. शिक्षण ही नदी न राहता ती स्पर्धेची शर्यत बनते. त्या शर्यतीत प्रत्येक जण धावत असतो; पण कुठे पोहोचायचे आहे, हे अनेकांना माहीतच नसते.

यामुळे कोचिंग संस्कृतीनेही अभूतपूर्व विस्तार घेतला. अनेक विद्यार्थ्यांसाठी शाळा केवळ उपस्थितीची जागा राहिली आणि खरे शिक्षण कोचिंग संस्थांच्या वर्गखोल्यांत स्थलांतरित झाले. लाखो रुपयांच्या फी, अंतहीन टेस्ट सिरीज, दिवसाचे बारा-बारा तास अभ्यास आणि प्रत्येक चाचणीनंतर स्वतःची इतरांशी तुलना या चक्रात विद्यार्थी अडकत गेला. ज्ञानाची तहान कमी झाली; गुणांची भूक वाढत गेली.

या व्यवस्थेचा सर्वात मोठा बळी ठरला तो विद्यार्थ्यांचा मानसिक समतोल. एका दिवसाच्या परीक्षेने आयुष्य ठरणार, ही भावना अनेकांच्या मनात एवढी खोलवर रुजली की परीक्षेपेक्षा परीक्षेची भीती मोठी झाली. काही जण उत्कृष्ट तयारी असूनही तणावामुळे अपेक्षित कामगिरी करू शकले नाहीत. काहींना आजारपणाने साथ दिली नाही. काहींच्याहातून किरकोळ चुका घडल्या. यातून विद्यार्थी आत्महत्या वाढत आहेत. मग प्रश्न असा आहे, एका दिवसातील अडथळ्यामुळे दोन वर्षांच्या परिश्रमांना शून्य ठरवणे कितपत न्याय्य आहे? बारावीच्या गुणांना महत्त्व मिळाले, तर विद्यार्थ्यांना पुन्हा वर्गाकडे, शिक्षकांकडे आणि पाठ्यपुस्तकांकडे वळावे लागेल. शाळेतील प्रत्येक तास महत्त्वाचा ठरेल. अभ्यास हा फक्त प्रवेश परीक्षेसाठी नसून ज्ञानासाठी आहे, ही जाणीव पुन्हा बळकट होईल. सातत्यपूर्ण प्रयत्नांचे मूल्य वाढेल. रोज केलेली छोटी प्रगतीही अंतिम यशाचा भाग बनेल. समितीने सुचवलेले इतर बदलही तितकेच दूरदृष्टीचे आहेत. प्रवेश परीक्षांचा अभ्यासक्रम शालेय अभ्यासक्रमाशी सुसंगत करणे, वर्षातून एकापेक्षा अधिक संधी देणे आणि भविष्यात अनुकूल संगणकीय परीक्षा पद्धती स्वीकारणे हे बदल शिक्षण अधिक विद्यार्थीकेंद्रित करण्याची दिशा दाखवतात. आयुष्याला दुसरी संधी मिळते, तर परीक्षेलाही ती मिळायला हरकत नाही.

तथापि, या प्रस्तावासमोर काही गंभीर प्रश्नही उभे राहतात. देशभरातील विविध शिक्षण मंडळांच्या मूल्यमापनाच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. काही मंडळांत गुण सहज मिळतात, तर काही ठिकाणी काटेकोर मूल्यमापन होते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय मिळावा, यासाठी गुणांचे वैज्ञानिक समायोजन आणि राष्ट्रीय दर्जाचे निकष विकसित
करावे लागतील. अन्यथा सुधारणा करण्याच्या प्रयत्नातून नवी विषमता निर्माण होऊ शकते.

शिक्षण म्हणजे फक्त प्रश्नपत्रिका सोडवण्याचे कौशल्य नाही. शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता, जिज्ञासा, संवेदनशीलता, संयम आणि सातत्य यांची जोपासना. प्रवेश परीक्षा विद्यार्थ्याची बौद्धिक तयारी मोजू शकते; पण त्याच्या दोन वर्षांच्या शिस्तीचे, परिश्रमांचे आणि चिकाटीचे मोल बारावीचे गुण अधिक चांगल्या प्रकारे सांगू शकतात. म्हणूनच या दोन्हींचा समतोल साधणारी व्यवस्था ही अधिक न्याय्य ठरू शकते. समाजाला केवळ गुणवान नव्हे, तर गुणवंत माणसे हवी आहेत. डॉक्टर आणि अभियंते केवळ प्रश्न सोडवणारे नसावेत; ते संवेदनशील, जबाबदार आणि जीवनमूल्यांची जाण असलेले नागरिकही असावेत.

अशा व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी एका दिवसाच्या परीक्षेत होत नाही; ती वर्षानुवर्षांच्या सातत्यपूर्ण शिक्षणातून घडते. शिक्षण हे शंभर मीटरची धावण्याची शर्यत नाही; ती आयुष्यभर चालणारी मॅरेथॉन आहे. मॅरेथॉनचा विजेता शेवटच्या शंभर मीटरवर ठरत नाही, तर प्रत्येक पावलावर साठलेल्या चिकाटीने घडतो. विद्यार्थ्यांच्याही आयुष्याचा निर्णय एका दिवसाच्या तीन तासांनी नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक दिवसाच्या प्रयत्नांनी व्हायला हवा.

कदाचित म्हणूनच हा प्रस्ताव केवळ प्रवेश प्रक्रियेतील बदल नाही; तो शिक्षणाच्या न्याय, समतोल आणि मानवी मूल्यांकडे परत जाण्याचा प्रयत्न आहे. जर या सुधारणेची अंमलबजावणी पारदर्शक, वैज्ञानिक आणि सर्वसमावेशक पद्धतीने झाली, तर ती केवळ गुण मोजणारी व्यवस्था बदलणार नाही ती विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे पाहण्याची आपली दृष्टीही बदलून टाकेल.

कारण शिक्षणाचा खरा निकाल गुणपत्रिकेत लागत नाही; तो विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वात, विचारांत आणि आयुष्य घडविण्याच्या क्षमतेत उमटत असतो. आणि त्या निकालासाठी एका दिवसाची परीक्षा कधीच पुरेशी नसते.



– राहुल हरिभाऊ इंगळे पाटील
मो. ९८९०५७७१२८

# ** कर्जमुक्ती : भविष्याची गुंतवणूक **

नैसर्गिक संकट व कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवांना पुन्हा सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' सुरू केली आहे. या योजनेचा लाभ म्हणजे शेतकरी बांधवांच्या उज्वल भविष्यासाठी गुंतवणूक ठरणार आहे. याविषयी या लेखात उहापोह करण्यात आला आहे.

कर्जमुक्ती केवळ खर्च नाही; ती राज्यातील अन्नदात्यांच्या भविष्यावर केलेली खरी गुंतवणूक आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' कडे पाहताना ही भावना प्रकर्षाने जाणवते. ही योजना केवळ थकीत कर्जाची रक्कम माफ करण्यापुरती मर्यादित नाही, तर शेती, शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्याने सक्षम करण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील शेती ही आजही मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, महापूर, गारपीट, रोगराई आणि वाढता उत्पादन खर्च या संकटांनी शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. अशा वेळी अनेक शेतकरी पीक कर्ज घेतात; मात्र प्रतिकूल परिस्थितीमुळे वेळेत परतफेड करता येत नाही. परिणामी ते नव्या पीक कर्जासाठी अपात्र ठरतात. कर्जाचे चक्र वाढत जाते आणि शेती करण्याची क्षमता कमी होत जाते. अशा दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढणे, हा या योजनेमागील मूलभूत विचार आहे.

शासनाने या वेळी केवळ कर्जमाफी जाहीर करून थांबण्याचा मार्ग स्वीकारलेला नाही. उलट,




शेतकरी पुन्हा सक्षम व्हावा, त्याला नव्याने कर्ज उपलब्ध व्हावे आणि शेतीतील गुंतवणूक वाढावी, या उद्देशाने योजनेची रचना करण्यात आली आहे. म्हणूनच कर्जमुक्तीबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली आहे. आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची ही भूमिका शासनाच्या संतुलित दृष्टिकोनाचे उदाहरण आहे.

या योजनेतील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे 'एकवेळ समझोता' (One Time Settlement) ही संकल्पना. पूर्वी कर्जाची रक्कम निर्धारित मर्यादेपेक्षा थोडी जास्त असल्यामुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहत होते. आता अशा शेतकऱ्यांना स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासनाकडून निर्धारित मर्यादेपर्यंतचा लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेत येण्याची संधी मिळणार आहे. ही तरतूद केवळ आर्थिक नाही, तर सामाजिक न्यायाचीही आहे.

महाराष्ट्रातील विशेषतः पश्चिम महाराष्ट्राचा विचार केला तर येथे ऊस, भात, फळबागा, भाजीपाला, दुग्धव्यवसाय आणि प्रक्रिया उद्योग यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली आहे. मात्र, सिंचनाची उपलब्धता असूनही बदलते हवामान, वाढते मजुरीचे दर आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे येथील शेतकरीही आर्थिक तणावातून जात आहेत. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला की त्याचा परिणाम केवळ त्याच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही. कृषी सेवा केंद्रे, खत-बियाणे विक्रेते, वाहतूक, कृषी अवजारे, दूध व्यवसाय, लघुउद्योग आणि ग्रामीण बाजारपेठ यांनाही त्याचा थेट लाभ होतो. म्हणूनच शेतकऱ्याला दिलेला आधार हा प्रत्यक्षात संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेला आधार असतो.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यात आली आहे. बँकांकडून पात्र शेतकऱ्यांची माहिती थेट शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली जात आहे. आधार प्रमाणीकरण, ग्रीस्टॅक, संगणकीय पडताळणी, गावनिहाय लाभार्थी यादी आणि तक्रार निवारण व्यवस्था यामुळे लाभ वितरण अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकरी वंचित राहू नयेत आणि अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळू नये, याची विशेष काळजी घेण्यात आली आहे.

या योजनेमागे शासनाची आणखी एक व्यापक भूमिका दिसून येते. कर्जमाफी ही अंतिम उपाययोजना नसून, शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्याची पहिली पायरी आहे. यासाठीच कृषी पायाभूत सुविधा, सिंचन, पीक विविधीकरण, तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यवर्धन आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासारख्या दीर्घकालीन उपाययोजनांवरही भर दिला जात आहे. त्यामुळे शेतकरी वारंवार कर्जाच्या चक्रात अडकणार नाही, हा शासनाचा प्रयत्न आहे.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले, यालाही विशेष अर्थ आहे. रयतेचे कल्याण, जलव्यवस्थापन, शेती आणि ग्रामीण विकास यांना प्राधान्य देणाऱ्या या लोकाभिमुख शासकाच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाची ही योजना जाहीर करून शासनाने इतिहासातील लोककल्याणकारी परंपरा आधुनिक काळाशी जोडली आहे.

आज कर्जमुक्तीची गरज केवळ कर्ज कमी करण्यासाठी नाही, तर शेतकऱ्याचा आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आहे. आर्थिक चिंता कमी झाली की शेतकरी अधिक धाडसाने नवे तंत्रज्ञान स्वीकारतो, उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतो आणि शेतीकडे उद्योग म्हणून पाहू लागतो. याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण ग्रामीण विकासावर होतो.

म्हणूनच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही. ती शासनाचा शेतकऱ्यावरील विश्वास, शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्याचा व्यापक संकल्प आहे. शेतकरी सक्षम असेल, तर शेती सक्षम होईल; शेती सक्षम झाली तर ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल; आणि ग्रामीण महाराष्ट्र समृद्ध झाला तरच विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल. हीच या योजनेमागील खरी प्रेरणा आणि दूरदृष्टी आहे.

– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

# पत्रकारीतेत डिजीटल माध्यमाचा प्रभावी वापर करा- कलादिग्दर्शक संतोष संखद

## दयानंद कला महाविद्यालयात डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** पत्रकारीतेत पत्रकारांनी सोशल मीडिया, युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम, वेब आदी डिजीटल माध्यमाचा प्रभावी वापर करावा असे आवाहन चित्रपट कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात आयोजित डिजीटल पत्रकारिता कार्यशाळेत केले. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व भारतीय संविधानाच्या पुजन करून करण्यात आली.

लातूर येथे भारतीय पत्रकार संघ, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, दयानंद कला महाविद्यालय लातूर आणि आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ४ जुलै २०२६ रोजी डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाच्या





उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. शाम टरके यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मंचावर लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी मसलगेकर, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक सचिव तथा भारतीय पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय परळकर आदींची उपस्थिती होती.

या कार्यशाळेत प्रसिद्ध कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी प्रशिक्षणादरम्यान डिजीटल पत्रकारितेतील कॅमेरा गल, प्रभावी व्हीडिओ निर्मिती, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, युट्यूब व फेसबुक, इंस्टाग्राम, वेब वरील कंटेटची मांडणी, प्रेक्षक संख्या वाढविण्याच्या पध्दती, लाईक, सबस्क्राईब आणि डिजीटल प्लॅटफॉर्म वरील यशस्वी उपस्थितीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पत्रकार बांधवांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यशाळेला पत्रकार राजकुमार गुडाप्पे, सितम सोनवणे, डी. एल. वाघमारे, राम रोडगे, मारोती माने, शिवाजी कांबळे, खंडेराव देडे, शिरीषकुमार शेरखाने, सुनील कांबळे आदींसह लातूर येथील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय परळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी केले तर आभार पत्रकार अमोल घायाळ यांनी मानले.

# लातूरचा मान उंचावणारा अभिनेता! 'घवडकुंड' च्या यशाने रॉकी देशमुख महाराष्ट्रभर चर्चेत




**लातूर/प्रतिनिधी:** मराठी चित्रपट 'घवडकुंड' च्या यशानंतर लातूर जिल्ह्याचे सुपुत्र आणि उदयोन्मुख अभिनेते रॉकी देशमुख यांच्या दमदार अभिनयाची संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चा रंगू लागली आहे. चित्रपटातील त्यांच्या प्रभावी भूमिका, सहज अभिनयशैली आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्समुळे प्रेक्षकांसह चित्रपट रसिकांकडून त्यांचे भरभरून कौतुक होत आहे. 'घवडकुंड'च्या यशामुळे केवळ चित्रपटालाच नव्हे, तर रॉकी देशमुख यांच्या अभिनय कारकिर्दीलाही नवी उंची मिळाली असून, लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यामुळे देऊळ बंद २ चे डायरेक्टर प्रवीण तरडे यांनीही रॉकी देशमुख यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यात देशमुख यांचे कौतुक होत असून लातूरातील सर्वच चित्रपट ग्रहाला आज त्यांनी भेट देऊन मनसोक्त गप्पाही मारल्या आहेत.

चित्रपटाला राज्यभरातून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील पीव्हीआर चित्रपटगृहात लातूरकरांच्या वतीने रॉकी देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित चाहत्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करत आगामी चित्रपटांसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

लातूर जिल्ह्याने यापूर्वी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता रितेश देशमुख यांच्या रूपाने राज्याला एक मोठा कलाकार दिला. आता त्याच परंपरेत रॉकी देशमुख यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि अभिनय कौशल्याच्या बळावर चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. 'घवडकुंड'मधील त्यांच्या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला असून, समीक्षकांकडूनही त्यांच्या अभिनयाचे कौतुक होत आहे.

चित्रपटातील त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सोशल मीडियावरही रॉकी देशमुख यांचे नाव चर्चेचा विषय ठरत आहे. विविध स्तरांतील मान्यवर, चित्रपटप्रेमी आणि चाहत्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, लातूरकरांमध्ये विशेष आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रॉकी देशमुख यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून, लातूर जिल्ह्यातील नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ग्रामीण भागातूनही मेहनत, चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर चित्रपटसृष्टीत यश मिळवता येते, याचे त्यांनी जिवंत उदाहरण घालून दिले आहे. त्यामुळे आगामी काळातही त्यांच्याकडून अधिक दर्जेदार भूमिका आणि उत्कृष्ट अभिनयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

'घवडकुंड'च्या यशाने रॉकी देशमुख यांचे नाव राज्यभर झळकू लागले असून, लातूरच्या सांस्कृतिक आणि कलाक्षेत्राच्या इतिहासात आणखी एका नव्या पर्वाची नोंद झाली आहे.

# ग्राहकाभिमुख सेवेची कार्यपूर्ती सहाय्यक अभियंता शीलरत्न सूर्यवंशी यांच्या सेवानिवृत्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** महावितरणच्या शहर शाखा क्र. १० येथे सहाय्यक अभियंता पदी कार्यरत असलेले शीलरत्न बाबुराव सूर्यवंशी हे नुकतेच बत्तीस वर्षाच्या प्रदीर्घ, उल्लेखनीय व ग्राहकाभिमुख सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने आयोजीत सेवापुर्ती सोहळा हॉटेल वाडा येथे मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमास मा. शिल्पाताई संजयजी बनसोडे, लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले , कार्यकारी अभियंता अनिरुद्ध घाडगे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता तथा सबऑर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनचे प्रादेशिक समन्वयक शैलेश पाटील, सहसचिव रितेश साबळे यांच्यासह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच सूर्यवंशी यांचे सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी महावितरणच्या वतीने सन्मानपत्र आणि सौ. सुर्यवंशी यांना साडीचोळी देत सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या. या




प्रसंगी शैलेश पाटील यांनी श्री सुर्यवंशी यांच्या कार्याचा आढावा घेत, त्यांनी नेहमीच महावितरणच्या हिताचा विचार करत प्रसंगी रात्री-अपरात्री ग्राहकांना सेवा देत राहीले. कोणाचाही मुलाहिजा न बाळगता केवळ कंपनी व ग्राहकहिताचेच निर्णय घेतल्याचे सांगितले. यावेळी शिलरत्न सुर्यवंशी यांच्या नातेवाईकांसह इतर मान्यवरांनी आपल्या मनोगतात शीलरत्न सूर्यवंशी यांच्या प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि ग्राहकाभिमुख सेवाकार्याचा गौरव केला. सेवाकाळात त्यांनी वीजग्राहकांच्या समस्या तत्परतेने सोडविणे, सहकाऱ्यांशी समन्वय राखणे आणि संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेले योगदान उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.


सत्काराला उत्तर देताना सूर्यवंशी यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभवांना उजाळा देत सहकारी अधिकारी, कर्मचारी, वरिष्ठ अधिकारी आणि कुटुंबीयांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

उपस्थितांनीही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी व दीर्घायुष्याच्या सदिच्छा व्यक्त केल्या. स्नेह, आपुलकी आणि कृतज्ञतेच्या वातावरणात पार पडलेला हा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँककडून ४४ हजार ६९९ कर्जखात्यांची माहिती अपलोड

**लातूर/प्रतिनिधी:** थकीत कर्जदार शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही योजना जाहीर केली आहे. लातूर जिल्ह्यात या योजनेची प्रभावी आणि गतीने अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय स्तरावरून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून पात्र कर्जदार शेतकऱ्यांची माहिती सहकार विभागाच्या पोर्टलवर अपलोड करण्याची कार्यवाही संबंधित बँकांमार्फत सुरु आहे. या अंतर्गत लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत ४४ हजार ६९९ कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जाणार आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे. अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५०




हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये, यासाठी राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**आधार प्रमाणिकरण अनिवार्य**

योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. एकवेळ समझोता योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**पात्र थकीत कर्जखात्यांवर व्याज न आकारण्याचे जिल्हा बँकांना आदेश**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता योजनेस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्ज खात्यांवर ०१ एप्रिल २०२६ ते योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी व्याज आकारणी करू नये, असे आदेश शासनाने राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिले आहेत. या योजनेअंतर्गत ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कर्जमुक्तीचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# एकरकमी कर भरणाऱ्यांना व्याजात सवलत मनपाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**लातूर/प्रतिनिधी:** दिनांक ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कर एकरकमी भरणाऱ्या नागरिकांना व्याज शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांनी आपल्याकडील थकीत कराचा भरणा करावा यासाठी महानगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. अनेक नागरिकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी शिल्लक आहे. नागरिकांनी व्याजात सुट देण्याची मागणी सुधा केली होती. नागरिकांची मागणी व कर वसुलीस चालना देणे साठी थकीत करावरील व्याजामध्ये सवलत देण्याचे निर्देश महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यानुसार नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी दिनांक ६ जुलै ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज शास्ती मध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तरी शहरातील नागरिकांनी या सुवर्ण संधींचा लाभ घेऊन आपल्याकडील थकीत कर महानगरपालिकेकडे भरणा करावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ‘प्राणी आणि त्यांचे अधिवास’ या विषयावर पोदार प्रेप, धाराशिव येथे थीमॅटिक टूरचे आयोजन




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार प्रेप, धाराशिव येथे ज्युनिअर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये 'Animals and Their Habitat' (प्राणी आणि त्यांचे अधिवास) या विषयावर आकर्षक थीमॅटिक टूर आयोजित करण्यात आली. यामध्ये वाळवंटी प्राणी, जंगलातील प्राणी, आर्क्टिक प्राणी, शेतातील प्राणी आणि समुद्री प्राणी** तसेच त्यांच्या अधिवासांची सुंदर आणि माहितीपूर्ण मांडणी करण्यात आली. या थीमॅटिक टूरद्वारे विद्यार्थ्यांना विविध प्राण्यांविषयी आणि ते कोणत्या वातावरणात राहतात याची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली. रंगीबेरंगी सजावट, आकर्षक मॉडेल्स आणि विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. लहानग्यांनी विविध प्राण्यांची ओळख करून घेत आनंदाने शिकण्याचा अनुभव घेतला. या उपक्रमात पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला. पालकांनी विद्यार्थ्यांसोबत थीमॅटिक टूरचा आनंद घेत शाळेच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेने घेतलेल्या या उपक्रमाला पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या निरीक्षण कौशल्यात, कल्पनाशक्तीत आणि निसर्गाविषयीच्या कुतूहलात वाढ झाली. संपूर्ण उपक्रमात विद्यार्थ्यांनी भरपूर आनंद घेतला आणि शिकता-शिकता मनोरंजनाचा अनोखा अनुभव मिळवला. हा उपक्रम शिक्षिका दीपिका मॅडम, सोना मॅडम, ललिता मॅडम आणि ऐश्वर्या मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

# अधिपरिचारका व परिसेविका यांची समपदावर समायोजन करण्याच्या मागणीसाठी निदर्शने

धाराशिव दि.३ (प्रतिनिधी) - शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कार्यरत अधिपरिचारका आणि परिसेविका यांना समपदावर समायोजन करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनच्यावतीने दि.३ जुलै रोजी करण्यात आले.

संचालक आरोग्य सेवा पुणे यांच्या आदेशान्व धाराशिव येथील ३७ अधिपरिचारिका व ६ परिसेविका यांचे बदली आदेश देण्यात आले आहेत. आरोग्य संचालक यांच्या आदेशाने सदरील आधी अधिपरिचारिका व परिसेविका यांना कार्यमुक्त करू नये असे जिल्हा शल्य चिकित्सक धाराशिव यांना आदेश केले होते. सध्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय नवनिर्मित असून जिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या अधिपरिचारीका व परिसेविका यांच्या बदल्या इतरत्र झाल्यास रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होऊन रुग्णसेवा कोलमडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सद्यस्थितीत सर्व परिसेविका व अधिपरीचारिका यांच्या मुलाचे शालेय शिक्षण सर्व प्रक्रिया पार पाडल्या असल्यामुळे शिक्षणावर मोठे संकट निर्माण होणार आहे. त्यांच्या सर्व मुला मुलींचे ॲडमिशन झाल्यामुळे त्यांना इतरत्र शाळा किंवा कॉलेजमध्ये प्रवेश मिळणे कठीण आहे. यामुळे सर्व शिक्षणाचे विपरीत संकट आहे. यापूर्वी अधिपरिचारीका व परिसेविका यांनी शासनास समपदावर समायोजन करण्यासाठी वारंवार पाठपुरावा केलेला आहे.

अशा परिस्थितीत त्यांच्या बदल्याचा घाट घातला असून त्यांचे कौटुंबिक वातावरण यामुळे दूषित झाले आहे. या बदली आदेशामुळे सर्व अधिपरिचारिका व परिसेविका यांची मानसिक खच्चीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे वरील प्रकरणाचा गांभीर्याने विचार करण्यात येऊन ते बदली आदेश तात्काळ रद्द करावेत या मागण्यासाठी निदर्शने करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनचे महाराष्ट्र राज्य कार्यकारी कार्याध्यक्ष मंगेश सुरवसे, महाराष्ट्र राज्य गव्हर्नमेंट नर्सेस असोसिएशनच्या जिल्हाध्यक्ष संगीता फंड, सचिव मनोज शेळके, उपाध्यक्ष छत्रपाल वाघमारे, खजिनदार सुवर्णा देशमुख, कार्याध्यक्ष रिबेका भंडारे, संध्या वर्पे, प्रेमा निंबाळकर, सुरेखा गवळी, वहिदा शेख, जयश्री ढोणे, सुरेखा कोकाटे, सुलभावती कौरव, मीना शेंडे, सुनिता शितल, आकाश मगर, मंगेश सुरवसे, मीना गोरे, वर्षाराणी बनसोडे, सविता शेंडगे, शीला म्हमाने, सीमा ऊलमुनगे, गिरीजा परसे, अश्विनी सोमासे, शोभा गायकवाड, अश्ताज तांबोळी आदींसह अधिपरिचारीका व परिसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणेअंतर्गत किरण वय २८ रा. भिमनगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव, समीर वय २३ वर्षे, रा. मुलतान गल्ली नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव, मुस्ताक वय ५३ वर्षे, रा. खाजानगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०३.०७.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे ॲटो रिक्षा क्र एमएच २५ ए.के.०८८४, टो रिक्षा क्र एमएच २५ ए.के. ०८८५ व टो रिक्षा क्र एमएच २५ ए.जी. ८९१२ ही वाहने नळदुर्ग बसस्थानक येथे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये नळदुर्ग पो. ठा. येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**धाराशिव गुड्स शेडसाठी विद्युत कामे**

विभागातील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)मध्य रेल्वे सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट संकेतस्थळा www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2026/02, **दिनांक:** ०३.०७.२०२६. **कामाचे नाव:** धाराशिव स्थानकावरील गुड्स शेडच्या विकासाशी संबंधित सामान्य विद्युत सेवांची कामे. **अंदाजित खर्च:** ८४,६८,०२८.७८ रुपये. **अनामत रक्कम:** १,६९,४००/- रुपये. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ०६ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** २८.०७.२०२६ रोजी १५:०० वाजता. अनामत रक्कम www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-पेमेंटद्वारे भरली जावी.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य), मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या, लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**
**9284321472**

# उपसंचालकांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा सर्वंकष आढावा

## आषाढी वारी, पावसाळी साथीचे आजार आणि ‘माझे गाव आरोग्यसंपन्न गाव’ अभियानावर विशेष भर ; गुणवत्तापूर्ण, लोकाभिमुख आरोग्य सेवा देण्याचे निर्देश



धाराशिव, (जिमाका) - राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा,परिमंडळ लातूर रेखा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली १ जुलै रोजी जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठक उत्साहात पार पडली.बैठकीत आगामी आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या पूर्वतयारीचा आढावा घेत नागरिकांना दर्जेदार,तत्पर आणि सुरक्षित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधीक्षक, जिल्हास्तरीय अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी,कार्यक्रम समन्वयक तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

आगामी श्री आषाढी वारी पंढरपूर पालखी सोहळा लक्षात घेऊन यात्रेदरम्यान आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारीबाबत चर्चा झाली. औषधसाठा,वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व्यवस्था,स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तसेच संसर्गजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

याशिवाय संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम,सार्वत्रिक लसीकरण,माता व बाल आरोग्य सेवा,कुटुंब कल्याण कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध योजनांची प्रगती,सेवा गुणवत्तावाढ तसेच शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ‘माझे गाव आरोग्यसंपन्न गाव’ या अभियानाचाही विशेष आढावा घेण्यात आला.हे अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त ग्रामपंचायतींना पुरस्कारासाठी पात्र ठरविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. लोकसहभागातून ही चळवळ अधिक व्यापक करण्यावर भर देत नागरिकांमध्ये आरोग्यदायी सवयी विकसित व्हाव्यात,आजार होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपायांची सवय लागावी आणि जनजागृती प्रभावीपणे व्हावी,असे निर्देश देण्यात आले.

यावेळी उपसंचालक रेखा गायकवाड यांनी सर्व आरोग्य संस्थांनी शासनाच्या आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना गुणवत्तापूर्ण,पारदर्शक आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा देण्याचे निर्देश दिले.

सहाय्यक संचालक (वैद्यकीय) डॉ. संजय ढगे यांनी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू,मलेरिया,अतिसार आणि ताप यांसारख्या साथीच्या आजारांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व आरोग्य यंत्रणेने विशेष दक्षता बाळगण्याचे आवाहन केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास तसेच जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकारी यांनी विविध आरोग्य कार्यक्रमांच्या प्रगतीचा आढावा सादर करत सर्व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयातून शासनाने दिलेली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर दिला.

बैठकीदरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांशी विविध आरोग्य योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण आणि सहज उपलब्ध आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी केले.

# पीक कापणी प्रयोगालाच प्राधान्य द्या, तांत्रिक उत्पादन पद्धत सदोष ! पीक विमा धोरणात बदलासाठी केंद्राकडे आग्रही भूमिका घ्या -आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई निश्चित करताना सध्या वापरण्यात येणारी 'तांत्रिक उत्पादन' निश्चितीची पद्धत अनेकदा शेतातील प्रत्यक्ष परिस्थितीची अचूक माहिती दाखवत नाही. त्यामुळे हजारो शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहत आहेत. या पद्धतीऐवजी पीक कापणी प्रयोगालाच प्राधान्य देण्यात यावे, अशी ठाम भूमिका आमदार तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन अर्थात मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांनी राज्याचे कृषीमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्याकडे पत्राद्वारे मांडली आहे.

यासंदर्भात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी झालेल्या चर्चेत पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या २०२५-२६ हंगामात तांत्रिक उत्पादन निश्चितीबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील तज्ज्ञांकडून स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास करण्यात आला होता. या अभ्यासामध्ये DSSAT मॉडेलद्वारे तांत्रिक उत्पादन निश्चिती, प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोग, हवामानातील बदल, अतिवृष्टी, पाणी साचणे, रोग-किडींचा प्रादुर्भाव तसेच स्थानिक कृषी परिस्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातून विद्यमान तांत्रिक उत्पादन निश्चिती पद्धतीत गंभीर त्रुटी असल्याचे स्पष्ट झाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनीही कृषी विद्यापीठाच्या अहवालाच्या आधारे राज्य शासनाकडे अहवाल सादर करून प्रत्यक्ष उत्पादन आणि तांत्रिक उत्पादनातील मोठी तफावत अधोरेखित केली आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उत्पादनाच्या आधारे विमा भरपाई देण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात यावी, अशी मागणी पत्राद्वारे आमदार पाटील यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, विद्यमान तांत्रिक उत्पादन निश्चितीची प्रक्रिया अनेक वेळा प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीची अचूक माहिती दाखवत नाही, ती सदोष आहे. परिणामी मोठे नुकसान होऊनही केवळ तांत्रिक अंदाजातील त्रुटींमुळे अनेक शेतकरी बांधवांना विमा भरपाईपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा मूलभूत उद्देशच बाधित होत असल्याची खंतही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रातून व्यक्त केली आहे. त्यांनी चार प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यानुसार केंद्र शासन आणि केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे प्रभावी पाठपुरावा करणे, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करून तांत्रिक उत्पादनाऐवजी पीक कापणी प्रयोगाला विमा भरपाईचा प्रमुख निकष म्हणून मान्यता देणे, कृषी विद्यापीठाच्या वैज्ञानिक अहवालाचा राज्य शासनाच्या अधिकृत भूमिकेसाठी आधार घेणे तसेच भविष्यात तांत्रिक उत्पादनातील त्रुटींमुळे कोणताही शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहणार नाही, यासाठी आवश्यक धोरणात्मक सुधारणा करण्याची मागणी दिलेल्या पत्रात करण्यात आली आहे.

**धाराशिवच्या लढ्याला राज्य सरकारची साथ; कृषिमंत्री भरणे यांनी बोलावली उच्चस्तरीय बैठक**

या संवेदनशील विषयाची गांभीर्याने दखल घेत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुढील आठवड्यात एक उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे. या बैठकीला कृषी विभागाचे प्रधान सचिव, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत कृषी विद्यापीठाचा वैज्ञानिक अहवाल, धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशी आणि विद्यमान तांत्रिक उत्पादन पद्धतीतील त्रुटींचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. त्यानंतर केंद्र शासन आणि केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीकडे शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकार आग्रही भूमिका मांडणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यक ते बदल करून, तांत्रिक उत्पादनाऐवजी प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान मूल्यांकनाची पद्धत स्वीकारण्याची अधिकृत मागणी राज्य सरकारकडून केंद्राकडे केली जाणार आहे. धाराशिव नव्हे तर राज्यासह देशभरातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या आर्थिक गणिताशी जोडलेला हा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने, राज्य सरकार आपण दिलेल्या पत्राच्या आधारे केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649